भारत सरकार

विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# बेनामी संव्यवहार (प्रतिषेध) अधिनियम, १९८८

**(सन १९८८ चा अधिनियम क्रमांक ४५)**

[दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान]

# The Benami Transactions (Prohibition) Act, 1988

**(Act No. 45 of 1988)**

**[ As in force on the 31st January, 2002]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

[ किंमत : रु. ४.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान असलेला दि बेनामी ट्रॅन्झॅक्शन्स (प्रोहिबिशन) ॲक्ट, १९८८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक १, दिनांक २३ जानेवारी, २००३ यात पृष्ठ ४९ ते ५० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जानेवारी, २००३.

**सुभाष सी. जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Benami Transaction (Prohibition) Act, 1988 as on the 31st January, 2002 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 12, dated 23rd January, 2003 on pages 45 to 50.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 23rd January, 2003.

SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

# बेनामी संव्यवहार (प्रतिषेध) अधिनियम, १९८८

## कलमांचा क्रम


कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. बेनामी संव्यवहारांना प्रतिषेध.

४. बेनामी म्हणून धारण केलेली मालमत्ता वसूल करण्याच्या हक्कास प्रतिषेध.

५. बेनामी म्हणून धारण केलेली मालमत्ता संपादन योग्य असणे.

६. विवक्षित प्रकरणी अधिनियम लागू असणार नाही.

७. विवक्षित उपबंधांचे अधिनियम निरसित करणे.

८. नियम करण्याची शक्ती.

९. निरसन आणि व्यावृत्ती.


एच ४१३५—२ (१०३५—१-२००४)

# बेनामी संव्यवहार (प्रतिषेध) अधिनियम, १९८८

## (१९८८ चा अधिनियम क्रमांक ४५)

(३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान)

[५ सप्टेंबर, १९८८]

**बेनामी संव्यवहारास आणि बेनामी म्हणून धारण केलेली मालमत्ता वसूल करण्याच्या हक्कास प्रतिषेध करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींसाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या एकोणचाळीसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, "बेनामी संव्यवहार (प्रतिषेध) अधिनियम, १९८८" असे म्हणावे.

(२) जम्मू आणि काश्मीर राज्ये वगळता याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) कलम ३, ५ आणि ८ मधील उपबंध तावडतोब अंमलात येतील आणि या अधिनियमातील उर्वरित उपबंध १९ मे, १९८८ रोजी अंमलात आल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमात संदर्भानुसार अन्य अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) "बेनामी संव्यवहार" याचा अर्थ, ज्यात एखादी मालमत्ता एका व्यक्तीकडे, अन्य व्यक्तीने चुकत्या केलेल्या किंवा तरतूद केलेल्या प्रतिफलाच्या बदल्यात हस्तांतरित केली जाते असा संव्यहार, असा आहे ;

(ख) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे.

(ग) "संपत्ती" याचा अर्थ, चल किंवा अचल मूर्त किंवा अमूर्त असलेली कोणत्याही प्रकारची मालमत्ता, असा आहे आणि त्यात अशा मालमत्तेवरील कोणतेही हक्क किंवा हितसंबंध यांचा समावेश होतो.

बेनामी संव्यवहारांना प्रतिषेध.

३. (१) कोणतीही व्यक्ती बेनामी संव्यवहारामध्ये सहभागी होणार नाही.

(२) पोटकलम (१) मधील कोणतीही गोष्ट,—

(क) कोणत्याही व्यक्तीने त्याच्या पत्नीच्या किंवा अविवाहित मुलीच्या नावाने खरेदी केलेल्या मालमत्तेस लागू होणार नाही, आणि तदविरुद्ध सिद्ध झाले नाही तर, उक्त मालमत्ता पत्नीच्या किंवा अविविाहित मुलीच्या लाभासाठी खरेदी करण्यात आली आहे, असे गृहीत धरण्यात येईल ;

[१](ख) (एक) निक्षेपधारी अधिनियम, १९९६, याचे कलम १०, पोटकलम (१) खाली नोंदणीकृत मालक म्हणून असलेल्या निक्षेपधारीने (डिपॉझिटरी) ;

(दोन) निक्षेपधारीचा अभिकर्ता म्हणून सहभागी होणाऱ्या व्यक्तीने, धारण केलेल्या रोख्यांना लागू होणार नाही.

स्पष्टीकरण.—"निक्षेपधारी" आणि "सहभागी व्यक्ती" या शब्दप्रयोगांना निक्षेपधारी अधिनियम, १९९६, कलम २, पोटकलम (१) मधील खंड (ङ) आणि (छ) मध्ये अनुक्रमे दिलेले अर्थ असतील.

(३) जो कोणी कोणत्याही बेनामी संव्यवहारामध्ये सहभागी होईल तो तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्हीस पात्र ठरेल.

(४) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या कलमाखाली झालेला अपराध बिनदखली आणि जामीनयोग्य असेल.

बेनामी म्हणून धारण केलेली मालमत्ता वसूल करण्याच्या हक्कास प्रतिषेध.

४. (१) बेनामी म्हणून धारण केलेल्या मालमत्तेच्या बाबतीत हक्क बजावण्याकरिता ती मालमत्ता ज्या व्यक्तीच्या नावाने धारण करण्यात आलेली असेल त्या व्यक्ती विरुद्ध किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीविरुद्ध, अशा मालमत्तेचा खरा मालक असल्याची हक्कमागणी करणाऱ्या व्यक्तीला किंवा तिच्या वतीने कोणताही दावा, हक्कमागणी किंवा कारवाई दाखल करता येणार नाही.

(२) बेनामी मालमत्तेचा खरा मालक म्हणून दावा सांगणाऱ्या व्यक्तीने किंवा तिच्या वतीने केलेल्या कोणत्याही दाव्यात हक्कमागणी किंवा कारवाईत, त्या मालमत्तेच्या बाबतीतील कोणत्याही हक्कावर आधारित कोणताही बचाव करण्यास-मग तो अशी मालमत्ता जिच्या नावे धारण करण्यात आलेली आहे त्या व्यक्तिविरुद्ध असो किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीविरुद्ध असो—परवानगी असणार नाही.

---

१. १९९६ चा अधिनियम २२, कलम ३० व अनुसूचीद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घातला (२० सप्टेंबर, १९९५ रोजी व तेव्हापासून).

(३) या कलमातील कोणतीही गोष्ट :

(क) जिच्या नावे मालमत्ता धारण करण्यात आली आहे, ती व्यक्ती जेव्हा हिंदू अविभक्त कुटुंबातील सहदायाद असेल आणि ती संपत्ती त्या कुटुंबातील सहदायाद व्यक्तीच्या लाभासाठी धारण केलेली असेल तेव्हा ; आणि

(ख) जिच्या नावे मालमत्ता धारण केलेली असेल ती व्यक्ति, जेव्हा विश्वस्त असेल किंवा विश्वासाश्रित नात्याने काम पाहणारी अन्य व्यक्ती असेल आणि ज्या व्यक्तींसाठी ती अशी विश्वस्त असेल किंवा विश्वासाश्रित या नात्याने काम पाहत असेल त्या व्यक्तीच्या लाभासाठी ती मालमत्ता धारण करण्यात आलेली असेल, तेव्हा लागू होणार नाही.

बेनामी म्हणून धारण केलेली मालमत्ता संपादन-योग्य असणे.

५. (१) बेनामी म्हणून धारण केलेली सर्व मालमत्ता विहित करण्यात येईल अशा प्राधिकरणाकडून, तशा रीतीने, आणि तशा कार्यपद्धतीचा अवलंब करून संपादन करण्यायोग्य असेल.

(२) शंका निरसनासाठी याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, पोटकलम (१) खाली कोणतीही मालमत्ता संपादित करण्यासाठी कोणतीही रक्कम देय असणार नाही.

विवक्षित प्रकरणी अधिनियम लागू असणार नाही.

६. संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ (१८८२ चा ४) याचे कलम ५३ याच्या उपबंधावर किंवा अवैध प्रयोजनांसाठी हस्तांतरण करण्याशी संबंधित कायद्यावर ह्या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही.

विवक्षित उपबंधांचे अधिनियम निरसित करणे.

७. (१) भारतीय विश्वस्त अधिनियम, १८८२ (१८८२ चा २) याची कलमे ८१, ८२ आणि ९४, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) कलम ६६ आणि आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) याचे कलम २८१ क ही याद्वारे निरसित करण्यात आली आहेत.

(२) शंका निरसनार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, पोटकलम (१) मधील कोणत्याही गोष्टीचा, आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) याचे कलम २८१ क याचे जम्मू आणि काश्मीर राज्यात प्रवर्तन चालू राहण्यावर परिणाम होणार नाही.

नियम करण्याची शक्ती.

८. (१) केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्यासाठी नियम करू शकेल.

(२) विशेषकरून आणि पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेला बाध न येता सर्व नियमांमध्ये खालील सर्व किंवा काही बाबींकरिता तरतूद करता येईल :—

(क) कलम ५ अन्वये मालमत्ता संपादित करण्यासाठी सक्षम प्राधिकरण ;

(ख) कलम ५ अन्वये मालमत्ता संपादित करण्यासाठी अनुसरावयाची रीत व कार्यपद्धती ;

(ग) विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो तयार करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या मुदतीकरिता सत्रासीन असताना राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या अधिनियमात कोणताही फेरबदल करण्यात दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करु नये म्हणून दोन्ही सभागृहे निर्णय घेतील तर फेरबदल केलेल्या स्वरूपात तो नियम अंमलात येईल किंवा यथाशक्ति येणार नाही, तथापि, असा फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टींच्या वैधतेस बाध येणार नाही.

निरसन आणि व्यावृत्ती.

९. बेनामी संव्यवहार (मालमत्ता वसूल करण्याच्या हक्कास प्रतिषेध) अध्यादेश, १९८८ (१९८८ चा अध्यादेश २) याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरीही उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही कृती किंवा कारवाई ही या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई**